International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 11 No. 6 July-Aug 2024

# विद्यार्थ्यांमधील कॉपी करण्याच्या मानसिकतेच्या कारणांचा शोध व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना:एक अभ्यास

**डॉ. विजय संतू पाटोळे**
सहाय्यक प्राध्यापक, रयत शिक्षण संस्थेचे,
स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर, अहमदनगर
**Corresponding Author: डॉ. विजय संतू पाटोळे**
**Email:** vijay.patole9@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.13739218**

**सारांश.**

परीक्षेत केली जाणारी कॉपी ही आपल्या शिक्षण व्यवस्थेतील कीड आहे. गुणवत्तेवर अन्याय करणारी ही कॉपी कायमची बंद होण्याची गरज आहे. मात्र, आधुनिक साधनांचा वापर करून कॉपीचे प्रकार सुरूच आहेत. एरवी अभ्यासात 'ढ' असणारे हे विद्यार्थी कॉपीसाठी वेगवेगळया युक्त्या वापरताना पाहिल्यावर त्यांची आणि त्यांच्या शिक्षण संस्थांचीही कीव करावीशी वाटते. मास कॉपीचे प्रकार तर भयानक असून परीक्षा पद्धतीलाच सुरुंग लावणारे आहेत. शिक्षक जर प्रभावी रित्या अध्यापन करीत असतील तर यांना का कॉपी करावी वाटते? गुणवत्तेचा प्रश्न सर्वात महत्वाचा आहे. आज कोरोनामुळे परीक्षा पद्धतीवर वेगळा प्रभाव निर्माण झाला आहे, सदर संशोधन लेखात कॉपीबाबत विद्यार्थ्यांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**सूचक शब्द:** परीक्षा, कॉपी, विद्यार्थी, शिक्षक, पर्यवेक्षण.

**प्रस्तावना:**

भारताची २१ व्या शतकाडे यशस्वी वाटचाल होताना दिसत आहे.सन १९४७ ते आजतागायत अनेक गोष्टी प्रभावित झाल्या आहेत त्यापैकी एक क्षेत्र म्हणजे शिक्षण क्षेत्र होय. ब्रिटीश राजवटीपासून चालू असलेली शिक्षण पद्धती व शिक्षणासाठी आजपर्यंत जे आयोग निर्माण केले गेले त्यापैकी एक म्हणजे विद्यापीठ शिक्षण आयोग (१९४८-४९) यात डॉ. राधाकृष्णन कमिशन यांनी म्हटले की, 'Universities are the homes of intellectual adventures'. विद्यापीठे हे बौद्धिक साहसाची वसतिस्थाने आहेत. कोठारी आयोग (१९६४-६६) यांनी शिक्षणातील १०+२+३ असा आकृतिबंध स्वीकारायला लावला. भारताचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी ५ जानेवारी १९८५ ला राष्ट्राला वैज्ञानिक व आर्थिक पाया भक्कम करण्यावर भर दिला, शैक्षणिक गुणवत्ता व ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांसाठी नवोदय विद्यालयाची संकल्पना हे प्रत्यक्षात आणली गेली. सन २०१२ च्या जन गणनेनुसार भारतात १५२ केंद्रीय विद्यापीठ, ३१६ राज्य विद्यापीठे,१९१ खाजगी विद्यापीठे व १८०० महिला महाविद्यालये आहेत. शिक्षणाचे स्वरूप बदलूनही आज शिक्षण क्षेत्रात कॉपी करण्याचे प्रमाण फार वाढले आहे. एक प्रकारची कीड लागली आहे.

**गरज:**

परीक्षा म्हटली कि अभ्यास आलाच आणि गुणवत्तेला दुसरा पर्याय नसतो.विद्यार्थीदशेत जर चांगला अभ्यास केला तर नक्कीच उत्तम यश मिळते.आज जर विद्यार्थ्यांचा विचार केला तर असे दिसून येते कि विद्यार्थी हा दिवसेंदिवस फार आळशी होत चालला आहे. अभ्यासाबाबत फार निष्काळजीपण दिसून येत आहे , यामुळे त्याला अपयश येते व परंतु अपयश हे यशाची पहिली पायरी असते हे मात्र त्याला समजत नाही. विशेष म्हणजे तो परीक्षेच्या काळातही निवांत असतो परिणामी अभ्यास करीत नाही व कॉपीवर अवलंबून राहतो. अभ्यासापेक्षा परीक्षेत गैरमार्गाचा अवलंब केला जातो. सर्वच विद्यार्थ्यांचे मूल्यमापन जरी परीक्षेद्वारे करता येते असे नाही मात्र परीक्षेला पर्याय पण उपलब्ध नाही. काही विद्यार्थी हे कधीच अभ्यास करीत नाहीत व शेवटच्या पंधरा दिवसात कसा तरी अभ्यास करून कॉपीवर निर्भर असतात. आजकालचे विद्यार्थी हे कानातील हेडफोन, शर्ट चा वेगवेगळया पद्धतीने वापर, क अंगावर हातावर लिहून आणणे, अशा कितीतरी गैरमार्गाचा अवलंब करतात. याद्वारे हुशार विद्यार्थ्यांचे अप्रत्यक्षरीत्या नुकसानच होते. कॉपी केल्यामुळे परीक्षा कक्षातील वातावरण बिघडते, शिक्षकांना धमकी देण्याचे प्रमाण , हाणामारीचे प्रकार सर्रास घडून येतात. नोटस, गाईड, पुस्तके इ चे सूक्ष्म स्वरूपातील आदान प्रदान वर्गात होत असते, विशेषतः काही ठिकाणी कॉपी पुरविणारे हे असतात. जर असेच घडत राहिले तर शिक्षणाद्वारे कधीही गुणवत्ता राखली जाणार नाही.

**महत्व:**

विद्यार्थ्यांना जर उत्तम अध्यापन केले तर निश्चित ते कधीही कॉपी करणार नाहीत. प्रभावी अध्यापन व अध्ययन सवयी विद्यार्थ्यांत जर निर्माण केल्या तर त्यांनी अश्या गैरमार्गाचा उपयोग होणार नाही.कॉपी मुक्त शाळा, महाविद्यालये झाली तर नक्कीच संबंधित देशाची प्रतिमा व प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही. प्रतिबंधात्मक उपाययोजना जर महाविद्यालयाने केली तर, वेळीच

पोलिसात तक्रार केली तर हे सर्व प्रमाण कायमचे निघून जाईल. विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती जर अनिवार्य केली तर नक्कीच ते फक्त स्व अभ्यासावर अवलंबून राहतील. विद्यार्थ्यांशी हितगुज, नवनवीन प्रयोग, प्रकल्प राबविले तर ते अभ्यासात रमतील, स्वतंत्रपणे विचार करतील आणि त्याचे शिक्षणातील सर्व अडथळे दूर होतील.

**उदिष्ट्ये:**

१. विद्यार्थ्यांच्या परीक्षेत कॉपी करण्याच्या सवयींचा शोध घेणे.
२. विद्यार्थ्यांच्या परीक्षेत कॉपी करण्यामागील सवयींचा कारणांचा शोध घेणे.
३. परीक्षेत कॉपी करण्यापासून प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचविणे.

**गृहितके:**

१. सर्व परीक्षार्थी कॉपी करतात.
२. सर्व परीक्षार्थीना कॉपी करण्याचे विविध मार्ग माहिती आहेत.
३. विद्यार्थ्यांना परीक्षेची भीती वाटत नाही.

**व्याप्ती व मर्यादा :**

१. सदर संशोधन हे महाराष्ट्र राज्यातील सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लागू आहे.
२. सदर संशोधन हे शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्र दहिवडी कॉलेज दहीवडी शी संबंधित आहे.
३. सदर संशोधन हे दहिवडी कॉलेज मधील वरिष्ठ महाविद्यालयाशी सर्व विद्याशाखांशी संबंधित आहे.
४. सदर संशोधन हे दहिवडी कॉलेज मधील वरिष्ठ महाविद्यालयातील फक्त ३०विद्यार्थ्यांशी संबंधित आहे.

**जनसंख्या :**

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर कार्यक्षेत्रातील सर्व वरिष्ट महाविद्यालये व त्यात प्रवेश घेतलेले सर्व शाखांचे विद्यार्थी ही जनसंख्या आहे.

**न्यादर्श:**

संशोधकाने संशोधनासाठी दहिवडी कॉलेजमधील सर्व शाखांत शिकणाऱ्या तृतीय वर्षातील ३० विद्यार्थी हे यादृच्छिक न्यादर्शातील सहेतुक पद्धतीने न्यादर्श निवडला आहे.

**संशोधन पद्धती:**

सदर संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**माहिती संकलनाची साधने :**

सदर संशोधनासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर संशोधकाने केला आहे.

**माहिती विश्लेषणाची साधने :**

सदर संशोधनासाठी शेकडेवारी या सांखिकीय साधनाचा तसेच आलेख, वर्तुळालेख यांचा वापर केलेला आहे.

**माहितीचे वर्गीकरण व अर्थनिर्वचन:**

| प्रश्न क्र. | प्रश्न | प्रतिसाद | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | आपल्या जीवनातील ध्येय | नोकरी ६०% | अधिकारी २०% | शिक्षक १०% | इतर १०% |
| २ | शिक्षणामुळे तुमचे चारित्र्य घडते | चारित्र्य = १००% | | | |
| ३ | जीवनात आपण कधी कॉपी केली | होय ५०% | | नाही ५०% | |
| ४ | कॉपी(नक्कल) केल्यामुळे तुम्हाला काय फायदा | जास्त गुण ३०% | टक्के वाढतात १०% | अभ्यासाची गरज नाही ३०% | सर्व ३०% |
| ५ | कॉपी(नक्कल) करण्याची का गरज | इतर करतात म्हणून ६ ०% | | अभ्यासाला वेळ मिळत नाही ४०% | |
| ६ | प्रत (रिडक्शन) काढनेसाठी प्रत्यक्ष किती खर्च | १००रु. ६०% | २० ते ५० रु. ३०% | | १००रु जास्त १० % |
| ७ | वर्गातील किती टक्के विद्यार्थी कॉपी करतात | १००% = १०% | | ५०% = ३०% | २०% =४०% |
| ८ | विद्यार्थ्यांना सहजासहजी कॉपी करता येते कारण | ढिले पर्यवेक्षण ३०% | पक्षपातीपणा १०% | शिक्षकांचे दुर्लक्ष ६०% | इतर ००% |
| ९ | कॉपी पकडल्यावर तुम्हावर काय कारवाई | पेपर जमा करून घेतला ९०% | | समज दिली १०% | |
| १० | दुसरे विद्यार्थ्यांना उत्तर विचाराने ही सुदधा एक कॉपी आहे | होय ७०% | | नाही ३०% | |
| ११ | तुम्ही कॉपी कशाच्या संदर्भात | सूत्रे १०% | व्याख्या ०% | सनावळया २% | सर्व १०% |
| १२ | कॉपी अभ्यासक्रमाच्या कोणत्या भागावर करतात | अवघड आशय | न शिकविलेला भाग २०% | ज्याचा अभ्यास राहिला तो १०% | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ७०% | |
| १३ | कॉपी पेक्षा अभ्यास करून पेपर लिहिल्यावर चांगले गुण मिळतात | होय १००% | नाही ००% |
| १४ | कॉपीची कीड लागण्याने गुणवत्ता रसातळाला गेली | होय १००% | नाही ००% |
| १५ | कॉपी कोठे कोठे करू शकतात व कोठे कोठे लपवू शकतात | प्यांट, हातावर लिहिणे, बुट, पेनात, पॅडवर, कॉलर,बेंच चपला | |
| १६ | कॉपी होऊ नये म्हणून काय काय उपाय योजना तुम्हाला सुचविता | • परीक्षेदरम्यान प्रत्येक महाविद्यालयाने परीक्षा कक्षात सी.सी.टी.वी. क्यामेरे लावावेत.<br>• महाविद्यालयात परीक्षा कक्षात मोबाईल ज्यामार लावावेत.<br>• परीक्षा वेगवेगळया संचात हव्यात.<br>• परीक्षा कक्षात दोन पर्यवेक्षकांनी पर्यवेक्षण करावे.<br>• कडक पर्यवेक्षण करावे.<br>• परीक्षा सुरु होण्यापूर्वी विद्यार्थ्यांची कसून झडती घ्यावी. | |

**निष्कर्ष:**

१) सदर प्रश्नावली मध्ये असे दिसून येते की ६०% विद्यार्थ्यांचे ध्येय हे शिकून नोकरी करणे असे आहे.

२) शैक्षणिक जीवनात ५०% विद्यार्थ्यानी कॉपी केली आहे ५०% विद्यार्थ्यांनी कधीही केली नाही.

३) कॉपी केल्यामुळे ३०% विद्यार्थ्यांना अभ्यास करण्याची गरज वाटत नाही .

४) इतर कॉपी करतात म्हणून आम्ही कॉपी करतो असे ६०% विद्यार्थ्यांचे मत आहे.

५) परीक्षेला ६०% विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे कि शिक्षक पर्यवेक्षण करताना दुर्लक्ष करतात.

६) अवघड आशयावर कॉपी केली जाते असे ७०% विद्यार्थ्यांचे मत आहे.

**योगदान:**

शिक्षण क्षेत्रात आतापर्यंत कोणीही कॉपी या विषयावर संशोधन केलेले नाही. या संशोधनामुळे कॉपी मुक्त परीक्षांचे आयोजन कसे करता येईल याबाबत नाविन्यपूर्ण सूचना प्राप्त झाल्या भविष्यात परीक्षांचे आयोजन करताना महाविद्यालयाला पुरेसे उपक्रम हाती घेता येतील. विद्यार्थ्यांच्या अध्ययन अडचणी सोडविता येतील, म्हणजे गुणवत्तायुक्त विद्यार्थी निर्माण करता येतील हेच या संशोधनाचे योगदान आहे.

**शिफारशी:**

१) परीक्षेदरम्यान प्रत्येक महाविद्यालयाने परीक्षा कक्षात सी.सी.टी.वी. कॅमेरे लावावेत.

२) महाविद्यालयात परीक्षा कक्षात मोबाईल जॅमर लावावेत.

३) परीक्षा वेगवेगळया संचात हव्यात.

४) परीक्षा कक्षात दोन पर्यवेक्षकांनी पर्यवेक्षण करावे.

५) कडक पर्यवेक्षण करावे.

६) परीक्षा सुरु होण्यापूर्वी विद्यार्थ्यांची कसून झडती घ्यावी. इलेक्ट्रोनिक साधने काढून घ्यावीत.

७) परीक्षा कालावधीत भरारी पथक नेमावेत.

८) शिक्षकांनी प्रभावी अध्यापन तंत्रांचा वापर करावा.

९) प्रश्नपत्रिकेत उपयोजनावर भर असणारे प्रश्न तयार करावेत.

**डॉ. विजय संतू पाटोळे**

**संदर्भ सूची:**


१. धनवडे, नंदकुमार, व धनवडे,सुरेखा.**भारतातील शिक्षणाचा विकास** :फडके प्रकाशन. पुणे:

२. Wikipedia-Indian Education.

३. https://www.youtube.com/watch?v=fY40rPzKF14

४. https://divyamarathi.bhaskar.com/news/nat-del-entrance-access-to-entrance-from-universities-in-2019-5757797-nor.html

५. https://www.linkedin.com/pulse/shadow-education-curse-disguise-angshuman-pal

६. https://www.international-school.edu.rs/explain-to-students-why-cheating-and-copying-are-bad/

७. https://www.thehindu.com/features/education/The-problem-of-copying-teaching-amp-learning/article16816545.ece

८. https://www.newindianexpress.com/magazine/voices/2024/Aug/31/it-is-time-to-redraw-the-admission-process

९. sakal.com/maharashtra/students-copying-in-exams-will-delay-education-for-3-years-this-year-there-will-be-no-water-distribution-staff-students-will-have-to-remove-their-slippers-and-shoes-outside

१०. marathi.abplive.com/news/nashik/nashik-latest-news-high-tech-copying-continues-electronic-device-found-in-sandals-and-bunions-in-clerk-exam-maharashtra-news